सकाळ पान-५

# ग्रामपंचायतींचे मतदान उत्साहात

## राज्यात ७४% | ठाणे ८०% | पालघर ७८% | रायगड ७९%

मुंबई, ता. १८ राज्यभरातील सात हजार १३५ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्राथमिक अंदाजानुसार आज सरासरी सुमारे ७४ टक्के मतदान झाले. यावेळी सदस्यपदांसह थेट सरपंचपदासाठीदेखील मतदान पार पडले. पालघर जिल्ह्यात ७८.६३, ठाण्यात ८०.३१, तर रायगडमध्ये ७९.२३ टक्के मतदान झाले. राज्य निवडणूक आयोगाने सात हजार ७५१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांची घोषणा केली होती. त्यातील काही ठिकाणी सरपंचपदाच्या, तर काही ठिकाणी सदस्यपदाच्या निवडणुका बिनविरोध झाल्या. त्यामुळे आज प्रत्यक्षात ७,१३५ ग्रामपंचायतींसाठी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान झाले. नक्षलग्रस्त भागात दुपारी ३.३० वाजेपर्यंतच मतदानाची वेळ होती.




पालघर : वाडा येथील मतदान केंद्रावर मतदारांनी मोठ्या उत्साहात मतदान केले.

## पालघरमध्ये दुपारनंतर जोर वाढला

पालघर, ता. १८ (बातमीदार) : पालघर जिल्ह्यातील ६३ ग्रामपंचायतींच्या निवडणुका घोषित झाल्या होत्या; मात्र त्यापैकी पालघर तालुक्यातील नावझे ग्रामपंचायत सरपंचासह बिनविरोध झाल्याने आज ६२ ग्रामपंचायतींसाठी मतदान झाले. प्रशासनाने दिलेल्या आकडेवारीनुसार सरासरी ७८.६३ टक्के मतदान झाले असून काही ग्रामपंचायतींमध्ये ८५ टक्के मतदान झाल्याचे वृत्त आहे.

पालघर तालुक्यात ३१, वसईमध्ये १५, वाडा येथे १४ व तलासरी येथे एक याप्रमाणे ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी मतदान झाले. पालघर तालुक्यात ४८,७९१; तर वसईत २९,४३७, वाडा येथे १४,१८९ व तलासरी येथे १३२५ मतदार होते. दुपारी ३.३० वाजेपर्यंत पालघर तालुक्यात ६४.३३ टक्के, वसईत ६६.४३, वाडा ७७.९७; तर तलासरी येथे ७९.७० टक्के मतदान झाले होते. दुपारनंतर मतदारांचा ओघ वाढला होता.




### भविष्याची रूपरेषा

राज्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाल्यानंतर झालेली सर्वात मोठी निवडणूक प्रक्रिया म्हणून या ग्रामपंचायती निवडणुकीकडे पाहिले जात आहे. त्यामुळे या निवडणुकीच्या निकालावर भविष्यातील राजकारण ठरणार आहे. विशेष करून शिवसेना शिंदे गट आणि ठाकरे गट यामध्ये कोणता गट बाजी मारणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले असून अनेक राजकीय नेते या निकालानंतर आपली वाटचाल ठरवणार असल्याचे समजते.

②

सकाळ पान-३

# हिवाळी अधिवेशनादरम्यान वीज कर्मचाऱ्यांचा मोर्चा

मुंबई, ता. १८ : राज्यातील वीज उद्योगाच्या खासगीकरणाविरोधात वीज कामगार, अधिकारी, अभियंते संघर्ष समितीच्या वतीने २३ डिसेंबर रोजी नागपूरमधील हिवाळी अधिवेशनावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात राज्यभरातील कामगार सहभागी होणार आहेत.

अदाणी इलेक्ट्रिसिटी वीज कंपनीने मुंबई महानगर प्रदेशातील काही भागात समांतर वीजपुरवठा करण्यास परवानगीसाठी अर्ज महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे दाखल केला आहे. यावर महावितरण कंपनी आपले म्हणणे आयोगाकडे सादर करून या निर्णयाला विरोध करणार आहे. त्यानंतर वीज कंपन्यांमधील कर्मचारी संघटनांनी याविरोधात भूमिका घेतली असून नागरिकांनी लोकप्रतिनिधींकडे अर्ज करून याला विरोध करावा, असे आवाहन महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी, अधिकारी अभियंता संघटनेने केले आहे. यानंतर संघटनेने वीज उद्योगाच्या खासगीकरणाविरोधात हिवाळी अधिवेशनावर धडक देण्याचा निर्णय घेतला आहे. या मोर्चासाठी कामगार, अधिकाऱ्यांनी सकाळी ११ वाजेपर्यंत इंदोरा चौक मैदान, कामठी रोड, नागपूर येथे पोहोचायचे आहे, असे आवाहन संघटनेने केले आहे. राज्य सरकार महावितरणपेक्षा खासगी कंपन्यांना प्राधान्य देत असल्याची टीका अनेक कर्मचारी संघटनांकडून करण्यात येत आहे.

सकाळ-पु. पान-४

# गळफास घेऊन तरुणाची आत्महत्या

नालासोपारा (बातमीदार) : घटस्फोट झाल्यामुळे मानसिक दाबावातून वसईत एका ३२ वर्षीय तरुणाने राहत्या घरात पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याची दुर्दैवी घटना रविवारी उघड झाली आहे. माणिकपूर पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पराग मेहता असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून तो वसईच्या विश्वकर्मा नगर येथे राहत होता. पराग हा मुंबईतील एका कंपनीत अकाऊंटंट म्हणून काम करीत होता. त्याचा साडेतीन वर्षांपूर्वी पत्नीसोबत घटस्फोट झाला होता. तेव्हापासून तो मानसिक दबावाखाली होता. याच मानसिक दबावातून परागने आपल्या राहत्या घरातील बेडरूमच्या पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली.

③

पुढारी पु. पान - ३

# मिरा-भाईंदर पोलीस भर्ती; ७४ हजार उमेदवारांचे अर्ज

## भरती प्रक्रिया पारदर्शकपणे होणार; उपआयुक्त प्रकाश गायकवाड

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

मीरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयात ९९६ पदासाठी पोलीस भरती करण्यात येणार आहे. या भरतीचा फॉर्म भरण्यासाठी १५ डिसेंबर २०२२ पर्यंत कालावधी देण्यात आला होता. पोलीस भरतीसाठी एकूण ७४,४५८ उमेदवारांनी अर्ज भरले आहेत. यामध्ये ६०,९८९ मुलांचे अर्ज तर १२,३२२ मुलींचे अर्ज पोलीस शिपाई या पदासाठी करण्यात आले आहेत. पोलीस वाहनचालकपदासाठी १,१९६ मुलांचे तर ४१ मुलींचे असे एकूण १,२३७ अर्ज आले असल्याची माहिती मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडून देण्यात आली आहे.

मिरा-भाईंदरमध्येच पोलीस भरतीची संधी उपलब्ध झाल्यामुळे तरुणांचे मोठ्या प्रमाणात अर्ज आले आहेत. सुरुवातीला ३० नोव्हेंबरपर्यंत पोलीस भरतीसाठी अर्ज भरण्याची मुदत होती, त्यात वाढ करून १५ डिसेंबरपर्यंत करण्यात आली होती. उमेदवारांचे अर्ज मोठ्या प्रमाणात आल्याने मैदान कमी पडू नये, यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून आयुक्तालयाकडून दोन मैदानांची निवड करण्यात आली आहे. त्याला मिरा-भाईंदर महापालिकेने परवानगी दिली आहे. यामध्ये भाईंदर पश्चिमेचे नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान व भाईंदर पूर्वेचे जैसलपार्क या मैदानाचा समावेश आहे. संपूर्ण पोलीस भरती पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक स्तरावर विशेष उपाययोजना करण्यात येणार असल्याचे पोलीस उपआयुक्त प्रकाश गायकवाड यांनी सांगितले आहे.

भरतीच्या कालावधीत मैदानांच्या बाहेर मोठ्या प्रमाणात तरुणांची गर्दी होणार आहे. यामुळे वाहतूककोंडीची समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे. वाहतूक नियंत्रणात राहावी, यासाठी अधिक पोलीस बळ मागवण्यात आल्याचे सांगितले आहे. भरतीच्या वेळी येणाऱ्या तरुणांसाठी काही मूलभूत गरजा आयुक्तालयाकडून उपलब्ध करून देण्यात येणार असून त्यात पिण्यासाठी पाणी, शौचालय यांचा समावेश असणार आहे. लवकरच अर्जदारांची मैदानी परीक्षा घेण्यात येणार असून त्यानंतर त्यांची लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे.

(ग)


पुढारी पान-१

# कडाक्याच्या थंडीत नागपूर तापणार!

## विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला आजपासून सुरुवात

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

हिवाळी अधिवेशनाच्या तोंडावर महाविकास आघाडीने मुंबईत हल्लाबोल मोर्चा काढत सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारविरोधात आघाडी उघडली. त्याचाच पुढचा अंक अधिवेशनात पाहायला मिळण्याची शक्यता आहे. महापुरुषांच्या विरोधातील विधाने, महाराष्ट्र-कर्नाटक सीमावाद, इतर राज्यात जाणारे उद्योग आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नावर सरकारला धारेवर धरण्याचा इशारा विरोधकांनी दिला आहे. तर या मुद्द्यांवरून सातत्याने होणारी टीका आणि प्रचार खोडून काढण्यासाठी सत्ताधारी शिंदे-फडणवीस सरकारनेही चांगलाच दारूगोळा जमा केला आहे. त्यामुळे कडाक्याच्या थंडीत नागपूर चांगलेच तापणार आहे.



- **हल्लाबोल मोर्चाचा पुढचा अंक सभागृहात रंगणार**
- **सत्ताधाऱ्यांनीही जमविला विरोधकांसाठी दारूगोळा**
- **सीमाप्रश्नावरून राजकीय टोलेबाजीची शक्यता**

हिवाळी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला प्रथेप्रमाणे सत्ताधारी आणि विरोधकांच्या पत्रकार परिषदा पार पडल्या. विरोधी पक्षाने यंदाही चहापानावर बहिष्कार टाकण्याची परंपरा कायम ठेवली. तीन वर्षांनंतर नागपुरात हिवाळी अधिवेशन होत असल्याने विदर्भासह राज्यातील मागास भागांचा प्रश्न, अनुशेष, प्रलंबित योजनांचे मुद्दे विरोधकांकडून उपस्थित केले जाणार आहेत. तर, राज्यपालांसह भाजप नेत्यांकडून वारंवार होणारा राष्ट्रपुरुषांच्या अवमानाचा मुद्दा अधिवेशनातही

/...२

(५)

पुढारी पु.पान-१

## सुरक्षारक्षक झोपल्याने मोबाईल चोरीला

**मिरारोड :** मिरारोड येथे एका इमारतीत असलेले सुरक्षारक्षक रात्री झोपले असताना चोरट्याने सुरक्षा रक्षकाचे दोन मोबाईल चोरी केले आहेत. हुसेन शेख हा एलिना टॉवर, गौरव फेस-२, मिरारोड येथे गेल्या अडीच वर्षापासुन सुरक्षा रक्षकाचे काम करत आहे. त्याच्याबरोबर त्याचा सहकारी दोघे काम करतात. त्या ठिकाणी नोकरी करत असलेल्या सिक्युरीटी कंपनीचा मोबाईल हा भी चार्जिंग करण्यासाठी लावला होता. तसेच त्याचा मोबाईल केबिनच्या बाहेर ठेवला होता. पहाटेच्या वेळी झोप लागल्याने व त्याचा सहकारी झोपी गेल्याने अज्ञात चोरट्याने दोन्ही मोबाईल लंपास केले आहे. सुरक्षा रक्षकाचे मोबाईल चोरल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

सामना पान-१

### एकीकरण समितीचा मेळावा

# महाराष्ट्रवासीयांना बेळगावात बंदी

### बोम्मई सरकारची मुजोरी कायम

**बेळगाव, दि. १८ ( वृत्तसंस्था) –** बेळगावात होत असलेल्या कर्नाटक विधिमंडळाच्या अधिवेशनाला विरोध करण्यासाठी महाराष्ट्र एकीकरण समितीने उद्या (सोमवार) महामेळाव्याचे आयोजन केले असून या मेळाव्याला अखेर कर्नाटक पोलिसांकडून सशर्त परवानगी दिली आहे. त्याचवेळी या मेळाव्यासाठी आमंत्रित करण्यात आलेल्या महाराष्ट्रातील नेत्यांना कर्नाटकने प्रवेशबंदी करून पुन्हा एकदा मुजोरी दाखवली आहे. दरम्यान, बेळगावात कलम १४४ लागू करण्यात आले आहे.



बेळगावात होणाऱ्या विधिमंडळ अधिवेशनाला दरवर्षी महाराष्ट्र एकीकरण समितीच्या वतीने महामेळावा घेऊन विरोध करण्यात येतो. तसाच मोर्चा यंदाही आयोजित करण्यात आलेला आहे. मात्र, गेले काही दिवस सीमावादावरून महाराष्ट्र आणि कर्नाटक या दोन्ही राज्यांत तणाव वाढला असल्याने हा मेळावा कर्नाटक पोलिसांच्या निशाण्यावर आहे. या मेळाव्याला परवानगीही देण्यात आली नव्हती. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसोबत एकीकरण समितीच्या नेत्यांची बैठक झाली मात्र त्या बैठकीतही ठोस निर्णय दिला गेला नव्हता. त्यानंतर आज पोलिसांनी या मेळाव्याला सशर्त परवानगी दिली.

**जिल्हाधिकाऱ्यांचा मुजोर आदेश**

सीमावादावर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी बैठक घेऊन 'जैसे थे' स्थिती ठेवण्याचे आदेश दिले असले तरी कर्नाटकची मुजोरी कायम आहे. एकीकडे बेळगावात होणाऱ्या एकीकरण समितीच्या मेळाव्याला पोलिसांनी शेवटच्या ▮पान ८

पुण्यनगरी पु. पान-९

# नाट्यगृह खासगी ठेकेदारास चालवण्यास देण्यास भाजपचा विरोध

## ठेकेदाराला चालवण्यास दिल्यास आंदोलन करणार

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर महापालिकेने मौजे महाजनवाडी येथे नाट्यगृह बनवले आहे. या नाट्यगृहाचे लोकार्पण ११ ऑक्टोबर रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. हे नाट्यगृह महापालिकेने चालवावे, असा ठराव करण्यात आला होता. मात्र तरी देखील महापालिका हे नाट्यगृह ठेकेदाराला चालवण्यास देणार आहे. महापालिकेच्या या धोरणाला माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी विरोध केला असून हे नाट्यगृह महापालिकेनेच चालवावे, अन्यथा महापालिकेविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल, असा इशारा मेहता यांनी दिला आहे.



भाईंदर महानगरपालिकेचे एकमेव असलेले लता मंगेशकर नाट्यगृह हे निविदा आणि कंत्राटे न काढता खासगी ठेकेदाराच्या हातात देण्याची तयारी महापालिका प्रशासनाने सुरू केली आहे. या धोरणाला भाजपने कडाडून विरोध केला आहे. मीरा-भाईंदर महापालिकेनेच हे नाट्यगृह चालवण्याची मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे जनतेच्या करातून बनवलेल्या सार्वजनिक मालमत्तेचा कारभार महापालिकेच्या वतीने खासगी कंत्राटदारांकडे सोपवण्यात येत आहे. यापूर्वी महापालिकेच्या वर्धमान फॅन्टसी पार्क (शिवार गार्डन), प्रमोद महाजन कम्युनिटी हॉल आणि मीनाताई ठाकरे कम्युनिटी हॉल आणि मॅक्सेस मॉलसमोरील मैदान, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स ही महापालिकेची मालमत्ता आहे. परंतु एकदा ठेकेदाराच्या हातात गेली की तेथे मनमर्जी प्रमाणे दर आकारले व त्याचा वापर केला जातो. वर्धमान फॅन्टसी पार्कमध्ये ठेकेदाराने जवळपास ४० अनधिकृत बांधकामे केली आहेत. अटीशर्तीचा भंग केला असून महापालिका ठेकेदारावर कारवाई न करता त्याला पाठीशी घालत आहे. स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स चालवणाऱ्या ठेकेदारालाच नवीन ठेकेदाराची नियुक्ती होईपर्यंत मुदतवाढ देणे अपेक्षित होते. मात्र प्रशासनाने त्याकडे दुर्लक्ष करून स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला परस्पर टाळे ठोकले. यामुळे शहरातील क्रीडापटू स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सपासून वंचित राहिले आहेत. अशा प्रकारे सर्वच महापालिकेच्या मालमत्तांचा नागरिकांना फायदा न होता ठेकेदाराचा फायदा होताना दिसत आहे. महापालिकेच्या २६ ऑगस्ट २०२२ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेत पालिका प्रशासनाने नाट्यगृह चालवण्याचा निर्णय घेतला होता.

असे असताना महापालिका प्रशासनाने हे नाट्यगृह बांधणाऱ्या विकासकालाच/खासगी कंत्राटदाराला चालवण्यास देण्याची तयारी सुरू केली असल्याचे समोर आले आहे. असे झाल्यास आम्ही एकही शो होऊ देणार नाही आणि रस्त्यावर उतरू, असा इशारा माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी दिला आहे. हे नाट्यगृह उद्घाटन होऊन दोन महिने झाले, तरी अद्याप सुरू केलेले नाही. नाट्यगृहाचे भाडे आणि ते चालवण्याचे धोरण अद्याप ठरलेले नसून येत्या काही दिवसांत नाट्यगृहात कार्यक्रम होणार आहेत. नाट्यगृह मोफत उपलब्ध करून दिले जात आहे. त्यामुळे मीरा-भाईंदर महापालिकेचे आर्थिक नुकसान होत आहे. लवकरात लवकर धोरण निश्चित करून नाट्यगृह सामान्य जनतेसाठी सुरू करावे व ते महापालिकेनेच चालवावे तसेच स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सही सुरू करावे, अन्यथा भाजपच्या वतीने महापालिकेविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन केले जाईल, असा इशारा माजी आमदार नरेंद्र मेहता यांनी दिला आहे.